आपले सरकार

महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान महामंडळ मर्यादित

MahaIT
IMAGINE. INVENT. INSPIRE

वार्षिक अहवाल २०१९-२०

महाDBT

महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान महामंडळ मर्यादित

यांचा

दिनांक १ एप्रिल, २०१९ ते दिनांक ३१ मार्च, २०२०

या वित्तीय वर्षाचा वार्षिक अहवाल

अनुक्रमणिका

अ.क्र.	तपशील	पृष्ठ क्रमांक	
		पासून	ते
१.	वार्षिक सर्वसाधारण सभेची सूचना	३	३
२	संचालकांचा अहवाल व जोडपत्रे	४	१५
३.	भारताचे नियंत्रक आणि महालेखापरीक्षकांचा अहवाल	१६	१७
४.	स्वतंत्र लेखापरीक्षकांचा अहवाल	१८	२७
५	दिनांक ३१ मार्च, २०२० रोजी संपलेल्या वर्षाचे ताळेबंद, नफा / तोटा पत्रक, रोख प्रवाह आणि वित्तीय विवरणाचा भाग असलेल्या टिप्पण्यां	२८	४९

महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान महामंडळ मर्यादित

(महाराष्ट्र शासनाचा अंगीकृत उपक्रम)

शाखा कार्यालय - तिसरा मजला, अपीजय हाऊस, दिनशॉ वाचा रोड, के. सी. कॉलेजजवळ, चर्चगेट, मुंबई - ४०० ०२०

हुतात्मा राजगुरू चौक, मॅडम कामा मार्ग मुंबई ४०००३२

सिन - U७४९९९MH२०१६SGC२८६५९१

वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस

संदर्भ AGM/२०१९-२०/१ **दिनांक २९/१२/२१**

प्रति,
सर्व भागधारक,
महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान महामंडळ मर्यादित
रूम नं ५१४, ५ वा मजला, मंत्रालय संलग्नक, (अनेक्स बिल्डिंग)
हुतात्मा राजगुरू चौक, मंत्रालय
मुंबई - ४०० ०३२

महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान महामंडळ मर्यादित यांच्या सभासदांची (पूर्वी तहकूब झालेली) चौथी - वार्षिक सर्वसाधारण सभा दिनांक **२५/१/२२** रोजी सकाळी ठीक ११.३० वाजता ५१४, ५ वा मजला, मंत्रालय संलग्नक, हुतात्मा राजगुरू चौक, मॅडम कामा मार्ग मुंबई ४०००३२ येथे महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान महामंडळ मर्यादित यांच्या नोंदणीकृत कार्यालयामध्ये खालील विषयाचा विचार विनिमय करण्यासाठी आयोजित केली आहे

१) ३१/३/ २०२० रोजी संपलेल्या वित्तीय वर्षातील महामंडळाचे लेखापरीक्षण केलेले ताळेबंद, नफा आणि तोटा विवरणपत्रांसह, वित्तीय विवरणपत्रे, त्याच्या टिपण्या, सूची व त्यावरील वैधानिक लेखापरीक्षक यांचा अहवाल आणि भारताचे नियंत्रक आणि महालेखापरीक्षक (C&AG) यांनी केलेल्या टिपण्या, आणि संचालक मंडळाचा अहवाल प्राप्त करणे, विचारात घेणे आणि स्वीकारणे.

संचालक मंडळाच्या आदेशानुसार

(संचालक)

टीप:- ज्या सभासदांना सभेस हजर राहण्याचा आणि मतदान करण्याचा अधिकार आहे अशा सभासदांना त्यांच्या वतीने हजर राहण्यासाठी आणि मतदान करण्यासाठी प्रतिनिधी नेमण्याचा अधिकार आहे. असा प्रतिनिधी महामंडळाचा सभासद असलाच पाहिजे असे नाही

महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान महामंडळ मर्यादित

नोंदणीकृत कार्यालय - ५१४, ५वा मजला, मंत्रालय संलग्नक,

हुतात्मा राजगुरू चौक, मॅडम कामा मार्ग मुंबई ४०००३२

सिन - U७४९९९MH२०१६SGC२८६५९१

संचालकांचा अहवाल

प्रति,
सदस्य,
महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान महामंडळ मर्यादित

तुमच्या संचालक मंडळास तुमच्या कंपनीचा व्यवसाय व कार्यचालन यांचा चौथा वार्षिक अहवाल आणि ३१ मार्च २०२० रोजी संपलेल्या वर्षाचे वित्तीय निकाल सादर करताना आनंद होत आहे.

१. **व्यवसायाचा आढावा -**

महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान महामंडळ मर्यादित (महाआयटी) ही कंपनी कायदा, २०१३ अंतर्गत गठित केलेली कंपनी आहे. ही कंपनी ऑक्टोबर, २०१६ मध्ये गठित झाली असून ती संपूर्णपणे महाराष्ट्र शासनाच्या मालकीची कंपनी आहे. महाराष्ट्र शासनाच्या माहिती तंत्रज्ञान विभागाच्या शासकीय निर्णयाच्या दिनांक ०९.०८.२०१६ नुसार महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान महामंडळाला खालील अधिकार प्रदान केले आहेत. (i) महाराष्ट्र शासनाच्या विविध विभागांसाठी विविध माहिती तंत्रज्ञान / माहिती तंत्रज्ञान सक्षम सेवा (Information Technology Enabled Services - ITES), स्मार्ट सिटी, आयओटी सोल्युशन्स, संगणक आपत्कालीन प्रतिसाद पथक (CERT) महाराष्ट्र आणि सुरक्षा ऑपरेशन सेंटर (SOC), भौगोलिक माहिती प्रणाली (Geographic Information System - GIS), सॉफ्टवेअर डेव्हलपमेंट, आयटी हार्डवेअर, नेटवर्किंग आणि कनेक्टिव्हिटी, क्लाउड सर्व्हिसेस, एसएमएस, पेमेंट गेटवे इत्यादी प्रकल्प अंमलात आणणे, त्यांचे व्यवस्थापन करणे, त्यांची देखरेख करणे. (ii) विशेष हेतू वाहन (एसपीव्ही) म्हणून महाराष्ट्र शासनातर्फे गठित केलेल्या प्रकल्प कंपन्यांची धारक कंपनी म्हणून काम करणे जसे भारत नेट, स्मार्ट सिटी इत्यादी; (iii) संगणक आणि त्याबरोबरील अन्य भाग (पेरिफेरल्स), माहिती तंत्रज्ञानाशी संबंधित सेवा पुरवणे; (iv) महाराष्ट्र राज्य शासनाचे सर्व विभाग, सामाजिक प्रकल्प, महामंडळे, राज्य शासन / केंद्र सरकार यांनी पारित केलेल्या कायद्यांनुसार गठित झालेल्या अनेक कंपन्या / संस्था, महामंडळे यांना माहिती तंत्रज्ञान सक्षम सेवांसाठी मनुष्य बळ पुरवणे; (v) महाराष्ट्र राज्य शासनाचे सर्व विभाग, सामाजिक प्रकल्प, महामंडळे, राज्य शासन / केंद्र सरकार यांनी पारित केलेल्या कायद्यांप्रमाणे स्थापन केलेल्या कंपन्या / संस्था, महामंडळे यांना तांत्रिक सहाय्य, संगणक विकत घेण्यासाठी सल्ला / सॉफ्टवेअर तसेच चालू व भविष्यातील माहिती तंत्रज्ञानाशी संबंधित / ई-गव्हर्नन्स संबंधित प्रकल्प याबाबत तांत्रिक सहाय्य व मार्गदर्शन पुरवणे आणि (vi) विविध राज्यांमध्ये तंत्रज्ञानाशी संबंधित यंत्रणा स्थापन करणे, त्याचे प्रचालन करणे व व्यवस्थापन करणे जसे राज्य माहिती केंद्र, राज्यव्यापी क्षेत्र नेटवर्क, आपले सरकार, आधार यामध्ये नोंदणी करणे इत्यादी.

२) वित्तीय सारांश –

तपशील	३१ मार्च २०२० रोजी संपलेल्या आर्थिक वर्षासाठी	३१ मार्च २०१९ रोजी संपलेल्या आर्थिक वर्षासाठी
प्रचालनातून महसूल	१३,२४,८५,६४,४४१	३,३४,७१,४९,८१५
इतर उत्पन्न	४८,६१,०६,८२६	२९,१५,०१,७९२
एकूण उत्पन्न	**१३,७३,४६,७१,२६७**	**३,६४,०६,५१,६०७**
एकूण खर्च	१२,९१,९५,७६,७३२	३,२१,३३,९३,६७८
कार्यचालन नफा / तोटा	८१,५०,९४,५३५	४२,७२,५७,९२९
उणे वित्तीय परिव्यय	७३,१५,४०,६८०	२१,२४,८९९
घसारा आणि परिशोधन याआधीचा नफा / तोटा	८,३५,५३,८५५	४२,५१,३३,०३०
उणे – घसारा	३२,७०,५२५	४,१४,०८७
कर खर्च आणि गतवर्षीचे मद याआधीचा नफा / तोटा	**८,०२,८३,३३०**	**४२,४७,१८,९४३**
उणे – गतवर्षीचे मद	–	–
उणे – कर (चालू कर, अतीरीक्त लाभ कर व स्थगित कर यासाठी तरतूद)	२,९३,७८,८५९	१२,२६,८३,०४२
स्थगित कर	२१,३८,२३५	१७,५२,६९९
निव्वळ नफा / तोटा	**४,८७,६६,२३६**	**३०,०२,८३,२०२**
निव्वळ मूल्य	**७३,७२,१९,०७४**	**७०,०५,०८,३६८**

३) वित्तीय कामगिरी –

अहवालाधीन वर्षामध्ये कंपनीला रु. ४,८७,६६,२३६/- इतका नफा झाला. गतवर्षी हा नफा रु.३०,०२,८३,२०१/- इतका होता.

४) राखीव निधी –

भविष्यातील कार्यकलापांसाठी कंपनीचे स्रोत राखून ठेवण्यासाठी कंपनीच्या संचालक मंडळाने चालू आर्थिक वर्षात कोणतीही रक्कम राखीव निधीमध्ये हस्तांतरित करायची नाही असे ठरवले आहे.

५) लाभांश –

भविष्यातील वाढीसाठी कंपनीचे तरल स्त्रोत राखून ठेवण्यासाठी संचालक मंडळ कंपनीच्या समभागांवर कोणत्याही लाभांशाची शिफारस करत नाही

६) वर्षात घडलेल्या महत्वाच्या घटना –

(अ) **कंपनीची स्थिती** –

कंपनीच्या स्थितीमध्ये काही बदल नाही.

ब) **कंपनीच्या व्यवसायाच्या स्वरूपामध्ये बदल (असल्यास)** –

कंपनी आपले कार्य संस्थापन अधिनियमावलीच्या (मेमोरँडम ऑफ असोसिएशन) कक्षेमध्ये करीत आहे. अहवालाधीन काळामध्ये कंपनीच्या व्यवसायाच्या स्वरूपामध्ये काही बदल झाले नाहीत.

क) **कंपनीच्या आर्थिक परिस्थितीवर परिणाम होतील असे कोणतेही महत्वाचे बदल किंवा बांधिलकी** –

कंपनीच्या वित्तीय वर्षाच्या अखेरच्या दिवसापासून या अह्वालाच्या तारखे पर्यंत कंपनीच्या आर्थिक परिस्थितीवर परिणाम होतील असे कोणतेही महत्वाचे बदल किंवा बांधिलकी झाली नाही.

७) भाग भांडवल –

संचालक मंडळाने असे कळवले आहे की कंपनीच्या भाग भांडवलामध्ये अह्वालाधीन वर्षात कोणताही बदल झाला नाही. कंपनीचे अधिकृत भाग भांडवल रु. २५,००,००,०००/- (रु. पंचवीस कोटी फक्त) असून. भरणा केलेले भांडवल रु. १०,००,००,०००/- (रु. दहा कोटी फक्त) यात प्रत्येकी रु.१०/- च्या पूर्ण भरलेल्या १,००,००,०००/- समभागांचा समावेश आहे.

८) **संचालक किंवा महत्वाच्या व्यवस्थापकीय व्यक्तींचा तपशील –**

कंपनीच्या संचालक मंडळामध्ये महाराष्ट्र शासनाने नामनिर्देशित केलेल्या विविध व्यक्तींचा समावेश आहे. कंपनीच्या संचालक मंडळाची संरचना ही महाराष्ट्र शासनाचे शासन निर्णय व कंपनीच्या संस्थापन नियमावली (आर्टिकल्स ऑफ असोसिएशन) वर अवलंबून आहे. कंपनीचे नामनिर्देशित संचालक हे पदसिद्ध तत्वावर / पायावर नेमले जातात.

सर्व संचालक महाराष्ट्र शासनाच्या शासन निर्णयाच्या आधारे किंवा आदेशाच्या आधारे नेमले जातात, त्यांच्या नेमणुकीसाठी वेगळे ठराव पारित करण्याची आवश्यकता नाही.

कंपनी गठित करण्याचा शासन निर्णय व संस्थापन नियमावलीनुसार संचालक मंडळाची संरचना पुढीलप्रमाणे –

१.	अतिरिक्त मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव, माहिती तंत्रज्ञान, महाराष्ट्र शासन	**पदसिद्ध अध्यक्ष**
२.	अतिरिक्त मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव (वित्त), महाराष्ट्र शासन	संचालक
३.	अतिरिक्त मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव (उद्योग), महाराष्ट्र शासन	संचालक

४.	संचालक (माहिती तंत्रज्ञान), महाराष्ट्र शासन	संचालक
५.	व्यवस्थापकीय संचालक (भाप्रसे)	संचालक
६.	मुख्य कार्यकारी अधिकारी हे संचालक मंडळाचे सदस्य असतील	संचालक
७.	माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातील तज्ञ (एक)	नामनिर्देशित
८.	शैक्षणिक क्षेत्रातील एक तज्ञ	नामनिर्देशित

वित्तीय वर्ष २०१९-२० मध्ये श्री. प्रसाद कोलते यांची कंपनीचे मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून नेमणूक करण्यात आली आणि कुलदीप चतुर्वेदी यांनी कंपनीचे संचालकपद सोडले. त्याच बैठकीत, मंडळाने श्री. निलय शाह यांच्या जागी श्री. निलेश शाह यांची कंपनी सचिव म्हणून नियुक्ती केली.

दिनांक ०६.०७.२०१९ ते दिनांक १९.१०.२०२० या कालावधीत कंपनीचे व्यवस्थापकीय संचालक म्हणून नेमणूक झालेल्या श्री. अजित पाटील यांच्या जागी दिनांक १९.१०.२०२० पासून श्रीमती जयश्री भोज यांची कंपनीच्या नवीन व्यवस्थापकीय संचालक म्हणून नेमणूक करण्यात आली आणि त्यानुसार महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान महामंडळ मर्यादितच्या संचालक मंडळावर संचालक म्हणूनही नियुक्ती करण्यात आली.

दिनांक १२.११.२०२० रोजी झालेल्या बैठकीत संचालक मंडळाने कंपनीच्या अध्यक्ष आणि संचालकपदावरून श्री. एस. व्ही. आर. श्रीनिवास यांच्या राजीनाम्याची नोंद घेण्यात आली. त्याच बैठकीत संचालक मंडळाने कंपनीच्या अध्यक्ष आणि संचालकपदी श्री. एस. व्ही. आर. श्रीनिवास यांच्या जागी श्री. विकासचंद्र रस्तोगी यांची नेमणूक करण्यात आली. श्री . एस. व्ही. आर. श्रीनिवास यांना पुन्हा श्री. विकासचंद्र रस्तोगी यांच्याकडून दिनांक २७.११.२०२० ते दिनांक १४.०१.२०२१ पर्यंत अतिरिक्त कार्यभार देण्यातआला. दिनांक १४.०१.२०२१ रोजी श्री. आभा शुक्ला यांची श्री. एस. व्ही. आर. श्रीनिवास यांच्या जागी पीएस माहिती तंत्रज्ञान म्हणून नेमणूक करण्यात आली आणि त्या कंपनीच्या अध्यक्षा बनल्या.

वर्षभरात कंपनीला नामनिर्देशित संचालकांचे (श्री. कौस्तुभ धवसे आणि श्री. सुनील राय) राजीनामे मिळाले. श्री. रणजित कुमार (माहिती तंत्रज्ञान विभाग महाराष्ट्र शासन याचे संचालक) दिनांक १४.०७.२०२० रोजी संचालक मंडळामध्ये संचालक म्हणून रुजू झाले. पीएस उद्योग श्री. बलदेव सिंग आणि श्री. राजीव मित्तल हे दिनांक १२.०३.२०२१ रोजी संचालक मंडळामध्ये संचालक म्हणून रुजू झाले.

सर्व संचालकांची नेमणूक महाराष्ट्र शासनाच्या आदेशानुसार किंवा ठरावानुसार आणि कंपनी गठित करणाऱ्या शासन ठरावानुसार केली जात असल्यामुळे, त्यांच्या नेमणुकीसाठी किंवा नियमितीकरणासाठी सर्वसाधारण सभेत स्वतंत्र ठराव पारित करण्याची आवश्यकता नाही.

९) **संचालक मंडळाच्या बैठकांची संख्या –**

अहवालाधीन वर्षात मंडळाच्या ४ (चार) बैठका संपन्न झाल्या.

१०) कंपनी कायदा २०१३ चे कलम १९७ सहपठित कंपनी नियम ५ (नियुक्ती वेतन व्यवस्थापकीय व्यक्तींची नियुक्ती आणि मोबदला) नियम, २०१४ नुसार सादर करण्याची माहिती –

ज्या कर्मचाऱ्यांचा तपशील कंपनी (व्यवस्थापकीय व्यक्तींची नियुक्ती आणि मोबदला) नियम २०१४ च्या नियम ५ (२) आणि (३) अंतर्गत देणे आवश्यक आहे ती निरंक समजावी कारण अशा कोणत्याही कर्मचाऱ्यांची नेमणूक व्यवस्थापकीय कर्मचारी म्हणून तुमच्या कंपनीने केली नाही.

संचालक (तांत्रिक) आणि महत्वाच्या व्यवस्थापकीय व्यक्तींना दिल्या जाणा-या वेतनाचा तपशील पुढीलप्रमाणे आहे.

अ.क्र.	मानधनाचा तपशील	संचालक आणि महत्वाच्या व्यवस्थापकीय व्यक्ती	
	नाव		
	पद	मुख्य कार्यकारी अधिकारी	मुख्य वित्तीय अधिकारी व **कंपनी सचिव**
१.	**एकूण वेतन**	रु.५६ लाख	रु.२२ लाख
	(अ) आयकर कायदा १९६१ चा भाग १७ (१) मधील तरतुदीनुसार वेतन	रु.५६ लाख	रु.२२ लाख
	(ब) आयकर कायदा १९६१ चा भाग १७ (२) खाली अवांतर प्रापणचे मूल्य	-	-
	(क) आयकर कायदा १९६१ चा भाग १७ (३) खाली वेतनाऐवजी नफा	-	-
२.	भाग विकल्प	-	-
३.	स्वेट समभाग	-	-
४.	कमिशन	-	-
	- नफ्याची टक्केवारी	-	-
	- इतर दर्शवावे	-	-
५.	अन्य कृपया खुलासा करा	-	-
	एकूण (अ)	**रु.५६ लाख**	**रु.२२ लाख**
	कायद्यानुसार मर्यादा	-	-

११) **संचालकांच्या जबाबदारीचे विधान -**

कंपनी कायदा २०१३ च्या तरतुदी नुसार संचालक याद्वारे सादर करतात,

(अ) कंपनीने वार्षिक वित्तीय विवरणे तयार करताना, महत्वाच्या फरकांशी संबंधित योग्य स्पष्टीकरणासह लागू असलेल्या लेखा मानकांचे पालन केले गेले आहे;

(ब) संचालकांनी अशी लेखाविषयक धोरणे निवडली आहेत आणि ती सातत्याने लागू केली आहेत की, ज्यामुळे वाजवी आणि विवेकपूर्ण निर्णय आणि अंदाज केले जातात. की ज्यामुळे आर्थिक वर्षाच्या शेवटी आणि

कंपनीच्या कारभाराचा खरा आणि न्याय्य दृष्टिकोन समोर ठेवता येईल व त्या काळातील नुकसान आणि गैरव्यवहार यांच्यापासून सुरक्षा मिळेल.

(क) संचालकांनी कंपनीच्या मालमत्तेचे रक्षण करण्यासाठी आणि फसवणूक आणि इतर अनियमितता रोखण्यासाठी आणि शोधण्यासाठी या कायद्याच्या तरतुदींनुसार पुरेशा लेखा नोंदी ठेवण्यासाठी योग्य आणि पुरेशी काळजी घेतली आहे;

(ड) संचालकांनी वार्षिक हिशेब नियमितपणे तयार केले आहेत; आणि

(इ) संचालकांनी सर्व लागू कायद्यांच्या तरतुदींचे पालन सुनिश्चित करण्यासाठी आणि अशा प्रणाली पुरेशा आणि प्रभावीपणे कार्यरत आहेत याची खात्री करण्यासाठी योग्य प्रणाली तयार केली आहे.

१२) वित्तीय विवरणांबाबत अंतर्गत वित्तीय नियंत्रणाबाबतचा तपशील –

तुमच्या कंपनीने आपल्या कामकाजाच्या आकाराशी, तसेच कार्यचालनाच्या गुंतागुंतीशी व प्रमाणाशी सुसंगत अशा पुरेशा वित्तीय नियंत्रण व्यवस्था / यंत्रणा यांचा अवलंब केला आहे. या यंत्रणामुळे विविध कायदे व पद्धती यांची पूर्तता होते व यंत्रणा संस्थेचा वाढीचा वेग व सतत वाढत जाणारी कार्यचालनाची गुंतागुंत या बरोबर सुसंगत राहतात.

१३) चालू वर्षामध्ये ज्या कंपन्या सदर कंपन्यांचा उपकंपन्या, संयुक्त साहस कंपन्या किंवा सहयोगी कंपन्या झाल्या आहेत किंवा व्हायच्या थांबल्या आहेत त्यांच्या तपशील –

अहवालाधीन काळामध्ये ज्या कंपन्या सदर कंपन्यांचा उपकंपन्या, संयुक्त साहस कंपन्या किंवा सहयोगी कंपन्या झाल्या किंवा व्हायच्या थांबल्या अशा कोणत्याही कंपन्या नाहीत.

१४) एकत्रित वित्तीय विवरणपत्रात समाविष्ट असलेली कंपनीची प्रत्येकी अधीन कंपनी, संयुक्त साहस कंपनी व सहयोगी कंपनी यांच्या कार्यचालनाचा आणि वित्तीय स्थितीचा अहवाल –

तुमच्या कंपनीची कोणतीही अधीन कंपनी, संयुक्त साहस कंपनी व सहयोगी कंपनी नसल्यामुळे, त्यांच्याबद्दल अहवाल करण्याचे कलम कंपनीला लागू होत नाही.

१५) ज्या कंपनीमध्ये अशी व्यक्ती व्यवस्थापकीय किंवा पूर्ण वेळ संचालक असते, त्या कंपनीच्या धारक किंवा सहाय्यक कंपनीकडून संचालकाने घेतलेल्या कमिशन बाबत खुलासा –

हे कलम कंपनीला लागू नाही.

१६) ठेवींचा तपशील

अहवालाधीन वर्षात, तुमच्या कंपनीने कंपनी कायदा, २०१३ चे कलम ७३ किंवा अन्य कोणतेही कलम सहपठित त्याअंतर्गत घालून दिलेले नियम यांच्या अर्थाप्रमाणे कोणत्याही मुदत ठेवी स्वीकारल्या नाहीत.

१७) कंपनी (ठेवी स्वीकारणे) नियम २०१४ चा नियम २ (१) (सी) (८) या अंतर्गत संचालकांकडून प्रकटन –

कंपनीने कंपनीच्या संचालकांकडून कोणत्याही रकमा स्वीकारलेल्या नाहीत त्यामुळे सदर कलम कंपनीला लागू होत नाही.

१८) कंपनी कायदा २०१३ च्या कलम १८६ च्या अंतर्गत तरतूदीनुसार कर्ज, हमी किंवा गुंतवणूकीचे तपशील –

अहवालाधीन वर्षात कंपनी कायदा २०१३ च्या कलम १८६ अंतर्गत तरतूदीच्या बाहेर कंपनीने इतर कोणत्याही कंपनी / व्यक्तीला कोणतेही कर्ज दिले नाही, कोणतीही गुंतवणूक केली नाही किंवा हमी दिलेली नाही.

१९) संबंधित पक्षाकारांबरोबरचे करार किंवा व्यवसायांचा तपशिल

कंपनी कायदा २०१३ च्या कलम १८८ (१) च्या तरतूदीनुसार संबंधित पक्षकारांबरोबर कंपनीने चालु वित्तिय वर्ष मध्ये कोणतेही व्यवहार केले नाहीत.

२०) कॉर्पोरेट सामाजिक जबाबदारी (सी. एस.आर.) धोरण

कॉर्पोरेट सामाजिक जबाबदारी समिती (सी. एस.आर.) ची भूमिका तिच्या सनदीने नियंत्रित केली जाते तसेच तिची संरचना ही कंपनी कायदा, २०१३ च्या कलम १३५ च्या तरतुदींची आणि त्या अंतर्गत घालून दिलेल्या नियमांची पूर्तता करते.

कॉर्पोरेट सामाजिक जबाबदारी समितीची भूमिका पुढीलप्रमाणे आहे –

अ) कंपनी कायदा २०१३ व त्या अंतर्गतच्या नियमांची पूर्तत करण्यासाठी कंपनीने अंगीकारण्याच्या कृती सूचित करणारे एक कॉर्पोरेट सामाजिक धोरण तयार करणे व त्याची शिफारस संचालक मंडळाला करणे.

ब) उपरोक्त कार्यासाठी खर्च करण्याच्या रकमेची संचालक मंडळाला शिफारस करणे.

क) कंपनीच्या कॉर्पोरेट सामाजिक जबाबदारीच्या धोरणाचे वेळोवेळी संनियंत्रण करणे.

ड) संचालक मंडळ ठरवेल ती कृती वेळोवेळी करणे.

कंपनीने अंगीकारण्याच्या कॉर्पोरेट सामाजिक जबाबदारीच्या कृतीच्या योजना आणि त्यासाठी लागणारे खर्च कंपनी कायदा, २०१३ च्या **अनुसूची ७ नुसार** कॉर्पोरेट सामाजिक जबाबदारीच्या धोरणात दर्शवावे लागते.

भारतातील कंपन्यांसाठी, कॉर्पोरेट सामाजिक जबाबदारी (सीएसआर) निभावणे याला आता भारतात वैधानिकरीत्या मान्यता प्राप्त झाली आहे; कंपनी कायदा, २०१३ च्या कलम १३५ ची तरतूद अशी आहे की – ज्या कंपन्यांचे निव्वळ मूल्य रु.५०० कोटी किंवा त्याहून जास्त आहे किंवा ज्यांची वार्षिक उलाढाल रु.१,००० कोटी किंवा त्याहून जास्त आहे किंवा गेल्या तीन वित्तीय वर्षांतील निव्वळ नफा रु.५ कोटी किंवा त्याहून जास्त आहे (दिनांक १८ जून २०१४ च्या परिपत्रक क्रमांक २१/२०१४ नुसार) अशा प्रत्येक कंपनीने प्रत्येक वित्तीय वर्षामध्ये त्यांनी लगतच्या मागील तीन वित्तीय वर्षांतील सरासरी निव्वळ नफ्याच्या किमान २ टक्के इतकी रक्कम कॉर्पोरेट सामाजिक जबाबदारी कृतीसाठी खर्च केली पाहिजे.

२१) ऊर्जेचे संवर्धन, तंत्रज्ञानाचे अवशोषण आणि परकीय चलन कमाई आणि विनिमय

अ) "ऊर्जेचे संवर्धन करण्यासाठी उचललेली पावले –

सर्व व्यावसायिक घटकांनी (युनिटसनी) ऊर्जेचा वापर कार्यक्षमरीत्या करण्याचे आपले प्रयत्न अधिकाधिक चालू ठेवले आहेत. ऊर्जेची बचत करण्यासाठी विविध मानकांचा मागोवा घेतला जातो जसे विशिष्ट ऊर्जेचा वापर आणि विशिष्ट ऊर्जेसाठी आलेला खर्च (परिव्यय).

ब) तंत्रज्ञानाचे अवशोषण –

कंपनी कायदा, २०१३ चे कलम १३४ (३) (एम) सहपठित कंपनी (लेखा) नियम, २०१४ च्या नियम ८ (३) या अंतर्गत कंपनीने करण्याचे प्रकटन खालीलप्रमाणे आहे.

(i) ऊर्जेचे संवर्धन –

ऊर्जेच्या संवर्धनावर उचललेली पावले किंवा परिणाम

कंपनी जास्त ऊर्जा खर्च न करणाऱ्या व्यवसाय कार्यचालनामार्फत कंपनी ऊर्जेच्या संवर्धनासाठी जागरुक प्रयत्न करते यासाठी उचललेली काही पाऊले पुढीलप्रमाणे आहेत –

१. कार्यालयात एलईडीचे दिवे वापरणे कारण ते जास्त ऊर्जा कार्यक्षम असतात.

२. कार्यालयाच्या आतमधील तापमानाचे नियमितपणे संनियंत्रण करणे आणि वातानुकूलन यंत्रणेवर नियंत्रण ठेवणे.

३. विजेचा वापर उचित आणि योग्य प्रकारे करणे.

४. नियोजित प्रतिबंधात्मक रखरखाव (मेंटेनन्स) करणे.

(ii) तंत्रज्ञान अवशोषण –

कंपनी स्वतः गतिमान माहिती तंत्रज्ञान क्षेत्रात काम करते. तंत्रज्ञानातील बदलांबरोबर अद्ययावत राहण्यासाठी पुरेसे तज्ञ कर्मचारी तंत्रज्ञान विभागामध्ये कंपनीकडे आहेत.

क) परकीय चलन अर्जन आणि बाह्यप्रवाह –

परकीय चलन अर्जन आणि बाह्यप्रवाह याबाबतचे प्रकटन (असल्यास) कंपनीच्या लेख्यांच्या टिप्पण्यांचा भाग असतील.

२२) जोखीम व्यवस्थापन धोरण –

अहवालाधीन वर्षामध्ये, कंपनीच्या व्यवसायावर नकारात्मक परिणाम होऊ नये यासाठी ज्या घटना, परिस्थिती आणि स्थिती असा परिणाम करु शकतील अशा घटना, परिस्थिती आणि स्थिती टाळण्यासाठी आणि आणि अनिश्चिततेचे व्यवस्थापन करण्यासाठी संरचित व्यवस्था निर्माण करणे यासाठी कंपनीने विविध उपाय योजले

आहेत. संचालक मंडळाच्या मते कंपनीच्या अस्तित्वाला धोका निर्माण करतील अशी कोणतीही परिस्थिती संचालक मंडळाच्या अहवालाच्या दिवशी अशा जोखमीची कोणतीही परिस्थिती उद्भवत नाही.

कंपनी आपली धोरणात्मक उद्दिष्टे साध्य करण्याच्या क्षमतेवर परिणाम करणाऱ्या मुख्य जोखीम आणि अनिश्चितता व्यवस्थापित करते, त्यांचे निरीक्षण करते आणि अहवाल देते. कंपनीच्या व्यवस्थापन प्रणाली, संरचना, प्रक्रिया, मानके, आचारसंहिता आणि वर्तन कंपनीच्या व्यवसायाचे संचालन नियंत्रित करतात आणि संबंधित जोखमींचे व्यवस्थापन करतात

२३) नियामकांनी, न्यायालयांनी किंवा न्यायाधिकरणांनी (ट्रिब्यूनल यांनी) जारी केलेल्या महत्त्वपूर्ण आणि महत्वाच्या आदेशांचे तपशील, भविष्यात कंपनीच्या चालू स्थितीवर आणि कंपनीच्या क्रियाकलापांवर परिणाम करतात.

अहवालाधीन वर्षात नियामकांनी, न्यायालयांनी किंवा न्यायाधिकरणांनी (ट्रिब्यूनल यांनी) असे कोणतेही महत्त्वपूर्ण आणि ठळक आदेश पारित केलेले नाहीत, ज्यामुळे कंपनीच्या चालू कंपनी या स्थितीवर किंवा कंपनीच्या भविष्यातील क्रियाकलापांवर परिणाम होईल.

२४) लेखा परिक्षण समिती -

ही कंपनी खाजगी कंपनी आहे त्यामुळे लेखापरीक्षण समितीचे गठन करण्याचे प्रावधान या कंपनीला लागू नाही.

२५) जागृती यंत्रणा

कंपनी कायदा, २०१३ चे कलम १७७ सहपठित कंपनी (संचालक मंडळाच्या बैठका व संचालक मंडळाचे अधिकार) नियम २०१४ यांच्या तरतुदीनुसार संचालक मंडळाने कंपनीच्या संचालनासाठी व कर्मचा-यांसाठी "व्हिसल ब्लोअर पॉलिसी" व वागणुकीचे नियम घालून दिले आहेत. सदर धोरण सर्व संचालक व कर्मचा-यांना संबंधित विभाग प्रमुखांमार्फत कळवले आहेत व नवीन कर्मचारी ज्यावेळी कंपनीमध्ये कामावर रुजू होतील तेव्हा त्यांना या धोरणाबद्दल माहिती देण्यात येईल.

कंपनीमध्ये प्रामाणिकपणा, खुलेपणा व जबाबदारी याबाबतची उच्च मानके पाळणे व कंपनीमधील प्रत्येक व्यक्ती ही कंपनीची ध्येये व उद्दिष्टे गाठण्यामध्ये महत्वाची भूमिका बजावू शकतो हे संचालक मंडळ जाणते आहे. जेव्हा कंपनीच्या नियमांचा, कायद्यांचा, नियमनांचा भंग होत आहे किंवा अशा आक्षेपार्ह लेखा धोरणे / लेखापरीक्षण पद्धती, भागधारकांना, शासनाला, वित्तीय बाजारातील चुकीची माहिती पाठविणे, गंभीर गैरवर्तणूक इत्यादीबाबत जागरुक राहणे व कंपनी व्यवस्थापनाला याबाबत कळवणे याबाबत कर्मचा-यांना जागरुक केले जाते.

कंपनीने कंपनीसाठी प्रशासन आणि वित्तीय नियमांची अंमलबजावणी केली आहे. यानंतर ज्यावेळी आवश्यकता असेल त्यावेळी जागृती यंत्रणा धोरणाची अंमलबजावणी करण्यासाठी पावले उचलेल.

२६) लेखापरीक्षक -

कंपनी कायदा, २०१३ च्या कलम १३९ (७) आणि कंपनी (लेखापरीक्षण आणि लेखापरीक्षक) नियम, २०१४ च्या तरतुदींनुसार, मे. एस. बी. एस. के. अँड असोसिएट्स, सनदी लेखापाल, मुंबई, (संस्था नोंदणी क्रमांक १११९५९ डब्ल्यू) (पूर्वी मे. एस. के. शेट्टी अँड असोसिएट्स, सनदी लेखापाल म्हणून संबोधले गेलेले) यांची लेखापरीक्षक

म्हणून नेमणूक केली आहे. भारताचे नियंत्रक आणि महालेखापरीक्षक यांनी मे. सी. आर. सगदेव आणि कंपनी सनदी लेखापाल यांची कंपनीचे वैधानिक लेखापरीक्षण म्हणून २०२०-२१ या वित्तीय वर्षासाठी नेमणूक करण्याची शिफारस करणारे पत्र कंपनीला प्राप्त झाले आहे.

कंपनीचे वैधानिक लेखापरीक्षक म्हणून काम करण्याला आपली संमती आहे अशा संमती पत्राची कंपनी प्रतिक्षा करीत आहे. मे. सी. आर. सगदेव आणि कंपनी सनदी लेखापाल यांची कंपनीचे वैधानिक लेखापरीक्षक म्हणून नेमणूक करावी अशी संचालक मंडळ सभासदांना शिफारस करीत आहे.

२७) वैधानिक लेखापरीक्षकांच्या अहवालावर टिप्पण्या -

कंपनीच्या २०१९-२० या वित्तीय वर्षाच्या वित्तीय विवरणांवरील वैधानिक लेखापरीक्षकांच्या अहवालात कंपनीच्या संचालक मंडळाकडून उत्तर देण्याची आवश्यकता असलेल्या कोणत्याही प्रतिकूल टिप्पण्या, निरीक्षणे किंवा टिप्पणी नाहीत.

२८) कंपनी अधिनियम २०१३ च्या कलम १४३ च्या उपकलम (१२) अंतर्गत वैधानिक लेखापरीक्षकांने अहवाल दिलेला कंपनीबाबतचा गैरव्यवहार किंवा आर्थिक अनियमितता -

कंपनी अधिनियम २०१३ च्या कलम १४३ च्या उपकलम (१२) अंतर्गत वैधानिक लेखापरीक्षकांने कंपनीबाबतचा गैरव्यवहार किंवा वित्तीय अनियमितता याबाबत अहवाल दिलेला नाही

२९) कलम १८६ अंतर्गत कर्ज, हमी किंवा गुंतवणूकीचे तपशील -

कंपनी कायदा, २०१३ चे कलम १८६ सहपठित कंपनी (संचालक मंडळाच्या बैठका आणि त्यांचे अधिकार) नियम, २०१४ या अंतर्गत कर्जे, हमी आणि गुंतवणुका यांचा २०२० मार्च ३१ रोजीचा तपशील हा कंपनीच्या एकल वित्तीय विवरणांच्या टिप्पणी (२६) मध्ये दिला आहे आहे. या टिप्पण्यां या अहवालाचा एक भाग आहेत.

३०) साचिविक लेखापरीक्षक

कंपनी कायदा, २०१३ च्या कलम २०४ च्या तरतुदीं कंपनीला लागू नाहीत.

३१) नामनिर्देशन व वेतन समिती

कंपनी कायदा २०१३ कलम १७८ च्या तरतुदी कंपनीला लागू नाहीत. त्यामुळे कंपनीने संचालक मंडळाची नामनिर्देशित व वेतन समिती गठीत केली नाही. तथापि, कंपनीने एक मनुष्यबळ समिती स्थापन केली आहे. ती जेव्हा आवश्यकता असेल तेव्हा नामनिर्देशन व मोबदला समितीचे काम करते.

३२) परिव्यय लेखापरीक्षक (कॉस्ट ऑडिटर)

कंपनी कायदा, २०१३ च्या कलम १४८ च्या तरतुदीं कंपनीला लागू नाहीत. त्यामुळे कंपनीला कोणतेही परिव्यय लेखापरीक्षक नेमण्याची आवश्यकता नाही.

३३) वार्षिक परताव्यासंबंधीची माहिती

कंपनी कायदा २०१३ च्या कलम ९२ (३) आणि कंपनी (व्यवस्थापन आणि प्रशासन) नियम, २०१४ च्या नियम १२(१) नुसार एप्रिल २०१८ ते मार्च २०१९ या काळाच्या वार्षिक परताव्याचा भाग नमुना एमजीटी - ९ या प्रारुपामध्ये सोबत परिशिष्ट॥ म्हणून जोडलेला आहे.

३४) कामाच्या ठिकाणी महिलेचा लैंगिक छळ (प्रतिबंध, अटकाव व निवारण) कायदा, २०१३ च्या प्रावधानांनुसार प्रकटन

कंपनी व्यक्तींच्या सन्मानाला किंमत देते आणि कंपनीचे सर्व कर्मचारी व सहयोगी यांना सुरक्षित आणि सन्माननीय कामाचे वातावरण उपलब्ध व्हावे यासाठी प्रयत्न करते. भेदभाव, धमक्या, धाकदपटशा व छळ यापासून मुक्त असे कार्य वातावरण आपल्या कर्मचा-यांना पुरवावे असा कंपनी प्रयत्न करते. महिला कर्मचाऱ्यांची एकात्मता व सन्मान यांचे संरक्षण करणे ही संस्थेची (कंपनीची) जबाबदारी आहे. तसेच कामाच्या ठिकाणी संघर्ष टाळणे, त्यामुळे उद्भवणा-या कामामधील अडथळे टाळणे ही कंपनीची जबाबदारी आहे यावर कंपनीचा विश्वास आहे. कंपनीने कामाच्या ठिकाणी महिलांचा लैंगिक छळ (प्रतिबंध, अटकाव आणि निवारण) कायदा, २०१३ ("लैंगिक छळ कायदा") नुसार 'लैंगिक छळाविरुद्ध धोरण' लागू केले आहे. या धोरणानुसार, कोणतीही महिला कर्मचारी आपली तक्रार गा-हाणे निवारण समितीसमोर आपल्या गा-हाण्याच्या निवारणासाठी सादर करु शकेल. कोणत्याही तक्रारदाराला अशी तक्रार करण्यासाठी पुरेसा मार्ग / सोयी उपलब्ध करुन दिल्या जातील याची कंपनी खात्री देते.

कामाच्या ठिकाणी महिलेचा लैंगिक छळ (प्रतिबंध, अटकाव व निवारण) कायदा, २०१३ च्या आवश्यकतेनुसार कामाच्या ठिकाणी महिलेचा लैंगिक छळ प्रतिबंध, करण्यासाठी कंपनी एक धोरण अवलंबले आहे. लैंगिक छळाबाबत प्राप्त झालेल्या तक्रारींचे निवारण करण्यासाठी अंतर्गत समित्या स्थापन केल्या आहेत. या धोरणामध्ये सर्व कर्मचाऱ्यांचा समावेश आहे. या धोरणा अंतर्गत कंपनीला २०१९-२० मध्ये एकही तक्रार प्राप्त झाली नाही.

३५) साचिवीक मानकांची पूर्तता

अहवालाधीन वर्षामध्ये तुमच्या कंपनीने कंपनीला लागू असलेल्या साचिवीक मानकांची योग्यरित्या पूर्तता केली आहे.

३६) कॉर्पोरेट गव्हर्नन्स (कंपनी शासन) -

कंपनीने वेळोवेळी कंपनी शासनाच्या चांगलया पद्धतींचा अवलंब करणे चालू ठेवले आहे. सल्लागार, विक्रेते, मंत्रिमंडळ व कर्मचा-यांचा विश्वास मिळवणे, यासाठी संचालक मंडळ हे पारदर्शकता, जबाबदारी व एकात्मता यावर संचालक खूप भर देते.

३७) अन्य प्रकटीकरण -

i. कंपनी कायदा, **२०१३** च्या कलम **२ (८७)** नुसार तुमच्या कंपनीची अधीन कंपनी नाही किंवा कलम **२ (६)** नुसार तुमच्या कंपनीची सहयोगी कंपनी नाही त्यामुळे संकलित वित्तीय विवरणे तयार करण्याची तरतूद कंपनीला लागू होत नाही.

ii. केंद्र सरकारने विहित केल्याप्रमाणे **कंपनी कायदा**, २०१३ **च्या** कलम १४८ च्या उपकलम (१) अंतर्गत परिव्यय लेखे (कॉस्ट रेकॉर्ड) ठेवण्याची कंपनीला आवश्यकता नाही.

३८) ऋणनिर्देश -

वित्तीय संस्था, बँका, लेखापरीक्षक, सल्लागार, पुरवठादार, मंत्रालय आणि कर्मचारी यांनी अहवालाधीन वर्षात कंपनीला जी मदत केली आणि सहकार्य केले त्याबद्दल तुमचे संचालक आपली कृतज्ञता व्यक्त करतात.

तसेच कंपनीच्या भागधारकांनी व धनकोंनी दिलेल्या आधारासाठी व कंपनीमध्ये ठेवलेल्या विश्वासासाठी तुमचे संचालक आपली कृतज्ञता व्यक्त करतात.

संचालक मंडळाच्या आदेशानुसार
महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान महामंडळ मर्यादित यांच्याकरिता

सही/-	सही/-
(जयश्री श्रीकांत भोज)	(प्रसाद परशराम कोलते)
व्यवस्थापकीय संचालक	सीओओ
डीन - ०७४६१९६३	डीन - ०८८०७२४१

दिनांक - २४.०३.२०२१

ठिकाण - मुंबई

प्रधान महालेखाकार (लेखापरीक्षा)- II का कार्यालय, महाराष्ट्र , नागपूर

गोपनीय

क्रमांक डीपी सेल/ AMG-IV / MITCL /२०१९-२० / ९३, ९४, ९५ दि. २४.१२.२०२१

प्रति,
व्यवस्थापकीय संचालक,
महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान महामंडळ मर्यादित
रूम नं ५१४, ५ वा मजला, अनेकस बिल्डिंग
हुतात्मा राजगुरू चौक, मंत्रालय
मुंबई - ४०० ०३२

विषय : महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान महामंडळ मर्यादित यांच्या ३१ मार्च, २०२० रोजी संपलेल्या वर्षाच्या लेख्यांवर कंपनी अधिनियम २०१३ च्या कलम १४३ (६) (ब) अंतर्गत भारताच्या नियंत्रक आणि महालेखापरीक्षक यांच्या टिप्पण्या

महोदय,

महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान महामंडळ मर्यादित यांच्या ३१ मार्च, २०२० रोजी संपलेल्या वर्षाच्या लेख्यांवर कंपनी अधिनियम २०१३ च्या कलम १४३ (६) (ब) अंतर्गत भारताच्या नियंत्रक आणि महालेखापरीक्षक यांचे निरंक टिप्पणी प्रमाणपत्र (Nil Comment) जोडले आहे.

कृपया वार्षिक अहवालाच्या तीन छापील प्रती या कार्यालयाला वार्षिक सर्वसाधारण सभा झाल्यानंतर पाठवून द्याव्यात, तसेच वार्षिक अहवाल विधानसभेत सादर करण्याची तारीख या कार्यालयाला सूचित करावी.

आपला,

सही/-
(रा. तिरुपति वेंकटसामी)
महालेखाकार (लेखा परीक्षा) II
महाराष्ट्र, नागपूर

सोबत : उपरोक्तनुसार

महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान महामंडळ मर्यादित यांच्या ३१ मार्च, २०२० रोजी संपलेल्या वर्षाच्या लेख्यांवर कंपनी अधिनियम २०१३ च्या कलम १४३ (६) (ब) अंतर्गत भारताच्या नियंत्रक आणि महालेखापरीक्षक यांच्या टिप्पण्या

कंपनी अधिनियम २०१३ मध्ये वित्तीय अहवालाबाबत निर्देशित केलेल्या चौकटीनुसार महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान महामंडळ मर्यादित मुंबई यांचे दि.३१ मार्च, २०२० रोजी संपणाऱ्या वर्षाची वित्तीय पत्रके तयार करण्याची जबाबदारी कंपनी व्यवस्थापनाची आहे. कंपनी अधिनियम २०१३ च्या १३९ (५) अंतर्गत भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांनी नियुक्त केलेले वैधानिक लेखापरीक्षक भारतीय सनदी लेखापालांच्या व्यावसायिक संस्थेने कंपनी अधिनियम २०१३ च्या कलम १४३ (१०) अंतर्गत निर्देशित केलेल्या लेखापरीक्षण प्रमाणकानुसार तसेच कंपनी अधिनियम २०१३ च्या कलम १४३ नुसार त्यांनी केलेल्या स्वतंत्र लेखापरीक्षणावर आधारित या वित्तीय पत्रकावर त्यांचे मत देण्यास जबाबदार आहेत. हे केल्याचे त्यांनी त्यांच्या दिनांक २४ मार्च, २०२० रोजीच्या लेखापरीक्षण अहवालामध्ये दर्शविण्यात आले आहे.

मी भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या वतीने महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान महामंडळ मर्यादित यांच्या ३१ मार्च, २०२० रोजी संपलेल्या वर्षाच्या लेख्यांचे कंपनी अधिनियम २०१३ च्या कलम १४३ (६) (ब) अंतर्गत वित्तीय विवरणपत्रांचे पुरवणी लेखापरीक्षण केले आहे. हे पुरवणी लेखापरीक्षण लेखापरीक्षकांच्या कामकाजाच्या कागदपत्रांची माहिती न घेता स्वतंत्रपणे केले गेले आहे आणि ते प्रामुख्याने वैधानिक लेखापरीक्षक आणि कंपनी कर्मचाऱ्यांच्या चौकशी आणि काही लेखा नोंदींच्या निवडक तपासणीपुरते मर्यादित आहे.

माझ्या लेखापरीक्षणाच्या आधारे माझ्या माहितीत महत्त्वाचे असे काहीही आढळले नाही ज्यामुळे कंपनी अधिनियम २०१३ च्या कलम १४३ (६) (ब) अंतर्गत वैधानिक लेखापरीक्षकांच्या अहवालावर कोणतीही टिप्पणी करता येईल किंवा त्यात भर घालता येईल.

भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्यावतीने,

सही/-
(रा तिरुपती वेंकटस्वामी)
मुख्य महालेखापाल (लेखापरीक्षा) - II
महाराष्ट्र, नागपूर

स्थळ : नागपूर

दिनांक : .१२.२०२१

एस. बी. एस. के. आणि असोसिएट्स

सनदी लेखापाल

बी-६०१, **आलिंद फोर्च्युना, शीतल बँक्वेट हॉलच्या बाजूला, ग्रँड होमटेल हॉटेलसमोर, माइंड स्पेस, चिंचोली बंदर. मालाड (पश्चिम), मुंबई** - ४०० ०६४. **दूरध्वनी**: ९८९२८०१२३९/३५, **ईमेल**: sksa१२३@yahoo.com / sksa१२३@live.in

स्वतंत्र लेखापरीक्षकांचा अहवाल

प्रति
सदस्य,
महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान महामंडळ मर्यादित

वित्तीय विवरणांवर अहवाल -

मत

आम्ही महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान महामंडळ मर्यादित ("कंपनी") च्या सोबतच्या वित्तीय विवरणांचे लेखापरीक्षण केले आहे/ त्यात दिनांक ३१ मार्च, २०२० रोजीचा ताळेबंद, दिनांक ३१ मार्च, २०२० रोजी संपलेल्या वर्षाचे नफा आणि तोटा यांचे विवरण, दिनांक ३१ मार्च, २०२० रोजी संपलेल्या वर्षाचे रोख प्रवाह विवरण आणि महत्वपूर्ण लेखा धोरणांचा सारांश आणि इतर स्पष्टीकरणात्मक माहितीचा सारांश समाविष्ट आहे.

आमच्या मते आणि आमच्या सर्वोत्कृष्ट माहितीनुसार आणि आम्हाला दिलेल्या स्पष्टीकरणानुसार, उपरोक्त वित्तीय विवरणे कंपनी कायद्याच्या तरतुदीनुसार आणि भारतात सर्वसाधारणपणे स्वीकृत असलेल्या लेखा मानकांच्या अनुषंगाने दिनांक ३१ मार्च, २०२० रोजीची कंपनीची स्थिती, दिनांक ३१ मार्च, २०२० रोजी संपलेल्या वर्षाचे नफा आणि तोटा यांचे विवरण, दिनांक ३१ मार्च, २०२० रोजी संपलेल्या वर्षाचे रोख प्रवाह विवरण यांची आवश्यक असलेली माहिती देतात यांची खरी व न्याय्य परिस्थिती दर्शवितात.

मतासाठी पाया -

आम्ही आमचे लेखापरीक्षण अधिनियमाच्या कलम १४३ (१०) अंतर्गत निर्दिष्ट केलेल्या लेखापरीक्षणाच्या मानकानुसार (एसएएस) केले. लेखापरीक्षणावरील त्या मानकांखालील आमच्या जबाबदाऱ्यांचे वर्णन आमच्या अहवालातील एकल वित्तीय विवरण विभागाच्या लेखापरीक्षकांच्या जबाबदाऱ्यांमध्ये केले आहे. आम्ही कंपनीपासून स्वतंत्र आहोत. भारतीय सनदी लेखापाल संस्थेने जारी केलेल्या आचार संहितेनुसार आणि कायद्याच्या तरतुदी आणि त्याखालील आमच्या लेखापरीक्षणाशी संबंधित असलेल्या नैतिक आवश्यकतांसह, आणि या आवश्यकता आणि आचार संहितेनुसार आम्ही आमच्या इतर नैतिक जबाबदाऱ्या पूर्ण केल्या आहेत. आम्हाला विश्वास आहे की, आम्हाला मिळालेले लेखापरीक्षण पुरावे आमच्या मताला आधार देण्यासाठी पुरेसे आणि योग्य आहेत.

बाबींवर भर –

वित्तीय विवरणाच्या टीप ग कडे आम्ही आपले लक्ष वेधतो. या टिपेमध्ये मुंबई वायफाय प्रकल्पाच्या पुरोबंधाच्या परिणामाचे वर्णन केले आहे. त्यामुळे रु.४१,८५,४७,८७०/- इतक्या कार्यकारी खर्चाचा वित्तीय विवरणामध्ये घटनासापेक्ष दायित्व म्हणून विचार केला जाईल.

या प्रकरणाबाबत आमचे मत बदललेले नाही.

वित्तीय विवरणांबद्दल व्यवस्थापनाची जबाबदारी

कंपनी कायदा, २०१३ ("अधिनियम") च्या कलम १३४ (५) मध्ये नमूद केलेल्या बाबींसाठी कंपनीचे संचालक मंडळ जबाबदार आहे, ही जबाबदारी आर्थिक स्थितीचे खरे आणि न्याय्य दृश्य देणारी ही वित्तीय विवरणे तयार करण्याच्या संदर्भात आहे. कंपनी (लेखा) नियम, २०१४ च्या नियम ७ सहपठित कंपनी कायदा कायद्याच्या कलम १३३ अंतर्गत विहित केलेल्या भारतीय लेखा मानकांसह, भारतात सामान्यत: स्वीकारल्या जाणाऱ्या लेखा तत्वांनुसार वित्तीय विवरणे तयार करण्यासाठी कंपनीचे संचालक मंडळ जबाबदार आहे. यामध्ये पुढील गोष्टींचा समावेश होतो. कंपनीच्या वित्तीय स्थितीचे खरे व न्याय्य दृश्य देणे, सर्वसमावेशक उत्पन्नासह कंपनीची कामगिरी, कंपनीचा रोख प्रवाह, कंपनीच्या समभागातील बदल. तसेच कंपनीच्या मालमत्तेचे रक्षण करण्यासाठी आणि फसवणूक आणि इतर अनियमितता रोखण्यासाठी आणि शोधण्यासाठी कायद्याच्या तरतुदींनुसार पुरेशा लेखा नोंदी ठेवणे, योग्य लेखा धोरणांची निवड, वाजवी व विवेकपूर्ण निर्णय, अंदाज बांधणे आणि पुरेशा अंतर्गत आर्थिक नियंत्रणांची रचना, अंमलबजावणी आणि देखभाल, जे लेखांकन नोंदीची अचूकता आणि पूर्णत: सुनिश्चित करण्यासाठी प्रभावीपणे कार्यरत होते ते करणे, स्वतंत्र भारतीय लेखा मानके यानुसार वित्तीय विवरण तयार करणे आणि सादर करणे, फसवणूक किंवा त्रुटीमुळे, महत्वाच्या चुकीच्या विधानापासून मुक्त यांच्याशी संबंधित अशी वित्तीय विवरणे जी वित्तीय स्थितीची खरे आणि निष्पक्ष दृश्य देतात, ती तयार करणे यांचा देखील समावेश होतो.

वित्तीय विवरणपत्रे तयार करताना, व्यवस्थापन एकतर कंपनी गुंडाळण्याचा किंवा कंपनीचे कामकाज थांबवण्याचा विचार करत नाही तोपर्यंत, किंवा तसे (कंपनी गुंडाळण्याचा किंवा कंपनीचे कामकाज थांबवण्याचा) करण्याशिवाय कंपनीला कोणताही वास्तववादी पर्याय नाही, अशी परिस्थिती आहे तोपर्यंत. कंपनीला चालू कंपनी तत्व लागू असल्याप्रमाणे, पुढे जाणाऱ्या बाबी संबंधित गोष्टी आणि लेखाविषयक चालू बाबी यांचा आधार वापरण्याच्या कंपनीच्या क्षमतेचे मूल्यांकन करण्यासाठी व्यवस्थापन जबाबदार आहे.

कंपनीच्या वित्तीय अहवाल प्रक्रियेवर देखरेख ठेवण्यासाठी देखील संचालक मंडळ जबाबदार आहे.

वित्तीय विवरणांबद्दल लेखापरीक्षकांची जबाबदारी :-

विवित्तीय विवरणे फसवणूक किंवा त्रुटीमुळे भौतिक चुकीच्या विधानापासून मुक्त आहेत अथवा नाही हे वाजवी आश्वासन मिळवणे,आणि आमचे मत समाविष्ट करणारा लेखापरीक्षण अहवाल जारी करणे हे आमचे उद्दिष्ट आहे. वाजवी हमी ही उच्च पातळीची हमी आहे, परंतु लेखापरीक्षणाच्या मानकांनुसार केले जाणारे लेखापरीक्षण जेव्हा अस्तित्वात असेल तेव्हा आमचे उद्दिष्ट नेहमीच चुकीचे विधान शोधून काढेल याची हमी नाही. चुकीची विधाने ही

फसवणूक किंवा त्रुटींमधून उद्भवू शकतात आणि वैयक्तिकरीत्या किंवा एकत्रितपणे, या चुकीच्या विधानांच्या आधारे घेतलेल्या वापरकर्त्यांच्या आर्थिक निर्णयांवर प्रभाव पडू शकतो.

लेखापरीक्षेच्या मानकांनुसार लेखापरीक्षणाचा एक भाग म्हणून, आम्ही व्यावसायिक निर्णय घेतो आणि संपूर्ण लेखापरीक्षेमध्ये व्यावसायिक संशय कायम ठेवतो.

- फसवणूक किंवा त्रुटींमुळे, वित्तीय विवरणाच्या भौतिक चुकीच्या विधानाच्या जोखमी ओळखणे आणि त्यांचे मूल्यांकन करणे, त्या जोखमींना प्रतिसाद देणारी लेखापरीक्षा प्रक्रिया तयार करणे आणि पार पाडणे आणि आमच्या मताचा आधार देण्यासाठी पुरेसे आणि योग्य लेखापरीक्षण पुरावे मिळवणे, फसवणुकीमुळे उद्भवलेल्या भौतिक चुकांच्या विधानाचा शोध न लागण्याची जोखीम त्रुटीचे परिणाम एकापेक्षा जास्त आहेत, कारण फसवणुकीत संगनमत, खोटारडेपणा, हेतूपुरस्सर वगळणे, चुकीचे सादरीकरण किंवा अंतर्गत नियंत्रण अधिलिखित यांचा समावेश असू शकतो.

- परिस्थितीत योग्य असलेल्या लेखापरीक्षा प्रक्रियेची रचना करण्यासाठी लेखापरीक्षणाशी संबंधित अंतर्गत नियंत्रणाची माहिती मिळवणे, कंपनी कायदा २०१३ च्या कलम १४३ (३) (I) अंतर्गत, कंपनीकडे पुरेशी अंतर्गत आर्थिक नियंत्रण प्रणाली आहे की नाही आणि अशा नियंत्रणांची कार्यक्षमता यावर आमचे मत व्यक्त करण्यासाठी आम्ही जबाबदार आहोत.

- वापरलेल्या लेखा धोरणांच्या योग्यतेचे आणि लेखा अंदाज आणि व्यवस्थापनाद्वारे केलेल्या संबंधित प्रकटीकरणांच्या वाजवीपणाचे मूल्यांकन करणे.

- व्यवस्थापनाच्या वापराच्या योग्यतेवर निष्कर्ष काढणे, लेखांकनाच्या चालू बाबी यांच्या आधारावर आणि प्राप्त झालेल्या लेखापरीक्षण पुराव्याच्या आधारावर, घटना किंवा परिस्थितीशी संबंधित भौतिक अनिश्चितता अस्तित्वात आहे की नाही ज्यामुळे कंपनीच्या चालू बाबी म्हणून चालू ठेवण्याच्या क्षमतेवर महत्वपूर्ण शंका येऊ शकते. जर आम्ही असा निष्कर्ष काढला की भौतिक अनिश्चितता अतिस्त्वात आहे, तर आम्हाला आमच्या लेखापरीक्षण अहवालात आर्थिक विवरणपत्रामधील संबंधित खुलाशांकडे लक्ष वेधून घेणे आवश्यक आहे किंवा जर असे खुलासे अपुरे असतील तर आमचे मत सुधारणे आवश्यक आहेत. आमचे निष्कर्ष आमच्या लेखापरीक्षण अहवालाच्या तारखेपर्यंत मिळालेल्या लेखापरीक्षण पुराव्यावर आधारित आहेत. तथापि, भविष्यातील घडामोडी किंवा परिस्थितीमुळे कंपनी पुढे चालू राहणे बंद करु शकते.

- वित्तीय विवरणांचे एकूण सादरीकरण, रचना आणि सामग्रीचे मूल्यमापन करणे ज्यामध्ये प्रकटीकरण समाविष्ट आहे आणि वित्तीय विवरणपत्र हे अंतर्निहित व्यवहार आणि घटनांचे योग्य सादरीकरण साध्य करण्याच्या पद्धतीने प्रतिनिधीत्व करतात की नाही हे तपासणे आवश्यक आहे.

आम्ही आमच्या लेखापरीक्षणादरम्यान ओळखल्या जाणाऱ्या अंतर्गत नियंत्रणातील कोणत्याही महत्वाच्या कमतरतांसह, इतर बाबींसह, लेखापरीक्षणाची नियोजित व्याप्ती आणि वेळ आणि महत्वपूर्ण लेखापरीक्षण निष्कर्षाबाबत प्रशासनासाठी जबाबदार असलेल्यांशी आम्ही संवाद साधतो.

आम्ही नैतिक प्रशासकीय आवश्यकतांचे पालन केल्याचे आणि आमच्या स्वातंत्र्यावर वाजवीपणे विचार करता येईल अशा सर्व संबंधित व इतर बाबींशी संवाद साधण्यासाठी, आणि जेथे लागू असेल, संबंधित सुरक्षा उपाय योजनांचे पालन केले आहे असे विधान प्रशासनासाठी जबाबदार असणाऱ्यांना सादर करतो.

प्रशासकीय त्रुटी असलेल्यांशी संवाद साधलेल्या प्रकरणांवरुन, आम्ही त्या बाबी निर्धारित करतो ज्या वर्तमान कालावधीच्या आर्थिक विवरणांच्या लेखापरीक्षणात सर्वात महत्वाच्या होत्या आणि म्हणूनच त्या मुख्य लेखापरीक्षणाच्या बाबी आहेत. आम्ही आमच्या लेखापरीक्षकांच्या अहवालात या प्रकरणांचे वर्णन करतो जोपर्यंत कायदा किंवा नियम या प्रकरणाबद्दल सार्वजनिक प्रकटीकरण प्रतिबंधित करत नाहीत किंवा जेव्हा, अत्यंत दुर्मिळ परिस्थितीत, आम्ही ठरवतो की, आमच्या अहवालात प्रकरण संप्रेषित केले जाऊ नये कारण असे केल्याचे प्रतिकूल परिणाम अशा संप्रेषणाच्या सार्वजनिक हिताच्या फायद्यासाठी वाजवीपणे अपेक्षित आहेत.

कायदेशीर आणि नियामक आवश्यकता यावर अहवाल –

१. कंपनी कायदा २०१३ च्या उपकलम (११) नुसार भारताच्या केंद्र सरकारने जारी केलेल्या कंपनी (लेखापरीक्षण अहवाल) आदेश २०१६ मधील आदेशानुसार, आम्ही "परिशिष्ट अ" मध्ये आदेशाच्या परिच्छेद ३ आणि ४ मध्ये निर्दिष्ट केलेल्या बाबींवर, लागू करण्यासाठीच्या मर्यादेपर्यंत एक विधान देतो.

२. कायद्याच्या कलम १४३ (३) नुसार, आमही अहवाल देतो की,

अ) आम्ही आमच्या लेखापरीक्षणाच्या उद्देशांसाठी आमच्या सर्वोत्तम ज्ञान आणि विश्वासानुसार आवश्यक असलेली सर्व माहिती आणि स्पष्टीकरणे आम्ही मागितली आहेत आणि ती आम्हाला प्राप्त झाली आहेत.

ब) आमच्या मते, कायद्यानुसार आवश्यक असलेली योग्य हिशोबाची पुस्तके कंपनीने आतापर्यंत ठेवली आहेत असे आमच्या तपासणीतून दिसून येते.

क) ताळेबंद, इतर सर्वसमावेशक उत्पन्नासह नफा आणि तोटा विवरण, रोख प्रवाह विवरण आणि लेखा पुस्तकांशी सहमत आहेत.

ड) आमच्या मते, उपरोक्त भारतीय लेखा मानक वित्तीय विवरणे कंपनी (लेखा) नियम, २०१४ च्या नियम ७ सह वाचलेल्या कायद्याच्या कलम १३३ अंतर्गत विहित केलेल्या भारतीय लेखा मानकांचे पालन करतात.

इ) ३१ मार्च, २०२० रोजी संचालक मंडळाने अभिलेखांवर घेतलेल्या संचालकांकडून प्राप्त झालेल्या लेखी निवेदनांच्या आधारे, ३१ मार्च, २०२० रोजी कोणत्याही संचालकांना अधिनियमाच्या कलम १६४ (२) नुसार संचालक म्हणून नियुक्त केल्यापासून अपात्र ठरविण्यात आलेले नाही.

फ) कंपनीच्या वित्तीय विवरणांच्या संदर्भात अंतर्गत वित्तीय विवरणांबाबत आणि त्यांच्या कार्यकारी परिणामकारकतेबाबत आम्ही परिशिष्ट "ब" मध्ये अहवाल दिला आहे तो पहावा.

ग) कंपनी (लेखापरीक्षक आणि लेखापरीक्षक) नियम, २०१४ च्या नियम ११ नुसार लेखापरीक्षकांच्या अहवालात समाविष्ट करावयाच्या इतर बाबींच्या संदर्भात, आमच्या मते आणि आमच्या सर्वोत्तम माहितीनुसार आणि आम्हाला दिलेल्या स्पष्टीकरणानुसार

i. कंपनीकडे तिच्या आर्थिक स्थितीवर परिणाम करणारे न्यायालयीन वाद प्रलंबित नाही;

ii. कंपनकडे डेरिव्हेटिव्ह करारासह कोणतेही दीर्घकालीन करार नव्हते ज्यामुळे कोणतेही नुकसान संभाव्य होते.

iii. कंपनीने कोणतीही रक्कम गुंतवणूकदार शिक्षण आणि संरक्षण निधीमध्ये हस्तांतरित करणे आवश्यक नव्हते.

एस बी एस के अँड असोसिएट्स

सनदी लेखापाल

संस्था नोंदणी क्रमांक: १११९५९W

सही/-

(सीए संजीव शेट्टी)

भागीदार

सदस्यत्व क्रमांक - ४५३१८

सहीचे ठिकाण - मुंबई

दिनांक - २४ मार्च, २०२१

युडीआयएन - २१०४५३१८AAAAEC९९८७

महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान महामंडळ मर्यादितच्या वित्तीय अहवालांवरील

स्वतंत्र लेखापरीक्षकांच्या सम तारखेच्या अहवालावरील परिशिष्ट "अ"

(आमच्या सम तारखेच्या अहवालाच्या इतर कायदेशीर आणि नियामक आवश्यतांवरील अहवाल अंतर्गत परिच्छेद १ मध्ये संदर्भित)

आमच्या आमच्या लेखापरीक्षणावर मध्ये आम्ही मागितलेल्या आणि आम्हाला दिलेल्या माहितीनुसार आणि आम्ही तपासलेल्या नोंदीच्या आधारे, आणि आमच्या सर्वोत्तम माहिती व विश्वासानुसार असे विधान करतो की,

i) **अ)** आम्हाला दिलेल्या माहितीनुसार व खुलाशांनुसार कंपनीने आपल्या मालमत्तेची, संयंत्रांची, साधने व उपकरणांची संख्यात्मक तपशील व ठिकाणे दर्शवणारा पूर्ण तपशील देणारे अभिलेख ठेवले आहेत
ब) कंपनीने सर्व मालमत्तेची प्रत्यक्ष पडताळणी केली नाही. तथापि, कंपनीचा नियमितपणे पडताळणी करण्याचा कार्यक्रम आहे व आमच्या मते कंपनीचा आकार व मालमत्तेचे स्वरुप ध्यानात घेता तो योग्य आहे. अशा प्रत्यक्ष पडताळणीमध्ये कोणतेही महत्वाच्या त्रुटी / फरक आढळून आले नाहीत.
क) आमच्या माहितीनुसार व आम्हाला दिलेल्या खुलाशानुसार आणि आम्ही तपासलेल्या अभिलेख्यांनुसार कंपनीकडे स्वत:च्या मालकीची कोणतीही अचल संपत्ती नाही. त्यामुळे आदेशाच्या कलम ३ (i)(क) नुसार अहवाल करणे लागू होत नाही.

ii) अ) कंपनी सेवाक्षेत्रात काम करते त्यामुळे कंपनी कोणताही मालसाठा धारण करीत नाही, त्यामुळे आदेशाचा परिच्छेद **३ (ii)** कंपनीला लागू नाही.

iii) अ) कंपनी कायदा, २०१३ च्या कलम १८९ अंतर्गत ठेवल्या जाणा-या नोंदवहीमध्ये समाविष्ट होणा-या कोणत्याही कंपन्या, भागीदारी संस्था, मर्यादित दायित्व भागीदारी संस्था किंवा अन्य कोणत्याही पक्षकारांना सुरक्षित किंवा असुरक्षित कर्ज दिले नाही. त्यामुळे आदेशाचा परिच्छेद ३ (iii) (अ) ते (क) कंपनीला लागू नाही.
ब) वर्षभरात कंपनी कायदा कलम १८९ अंतर्गत ठेवलेल्या नोंदवहीमध्ये समाविष्ट कोणत्याही कंपनीला, भागीदारी संस्थेला, मर्यादित भागीदारी संस्थेला किंवा अन्य पक्षकारांना देय अशा कर्जाच्या थकित शिल्लक **क)** रकमा नव्हत्या. त्यामुळे आदेशाचा परिच्छेद ३ (iii) (ब) कंपनीला लागू नाही.
ताळेबंदाच्या दिवशी कंपनी कायदा कलम १८९ अंतर्गत ठेवलेल्या नोंदवहीमध्ये समाविष्ट कोणत्याही कंपनीला, भागीदारी संस्थेला, मर्यादित भागीदारी संस्थेला किंवा अन्य पक्षकारांना देय अशा कर्जाच्या थकित शिल्लक रकमा नव्हत्या. त्यामुळे आदेशाचा परिच्छेद ३ (iii) (क) कंपनीला लागू नाही.

iv) आमच्या मते कंपनीने कर्ज, हमी , सुरक्षा किंवा गुंतवणूक, याबाबत कंपनी कायदा, २०१३ च्या कलम १८५ आणि १८६ च्या तरतुदींची पूर्तता केली आहे.

v) आमच्या मते कंपनीने अधिनियमाच्या कलम ७३, ७४, ७५ आणि ७६ आणि त्याअंतर्गत तयार केलेल्या नियमांनुसार अधिसूचित केलेल्या मर्यादेपर्यंत जनतेकडून कोणत्याही ठेवी स्वीकारलेल्या नाहीत.

vi) आम्हाला प्राप्त झालेली माहिती आणि देण्यात आलेल्या स्पष्टीकरणाच्या आधारे केंद्र शासनाने परिव्यय अभिलेख ठेवण्याच्या नियमांच्या कलम १४८ (१) च्या तरतुदींनुसार निर्देष्टीत लेखे आणि अभिलेख तयार करण्याचे आदेश कंपनीला दिले नाहीत.

vii) अ) कंपनीने भविष्यनिर्वाह निधी, कर्मचाऱ्यांचा राज्य विमा, आयकर, विक्रीकर / मूल्यवर्धित कर, सेवा कर, वस्तू आणि सेवा कर, सीमा शुल्क, उत्पादन शुल्क, सेस अशा निर्विवाद वैधानिक देय आणि

कंपनीस लागू असलेले यथायोग्य प्राधिकरणांना देय असलेले इतर वैधानिक देय सर्वसाधारणपणे नियमितपणे अदा केलेली आहेत.

ब) कंपनीने भविष्यनिर्वाह निधी, कर्मचाऱ्यांचा राज्य विमा, आयकर, विक्रीकर / मूल्यवर्धित कर, सेवा कर, वस्तू आणि सेवा कर, सीमा शुल्क, उत्पादन शुल्क, सेस अशा निर्विवाद वैधानिक देय आणि कंपनीस लागू असलेले यथायोग्य प्राधिकरणांना देय असलेले इतर वैधानिक देय सर्वसाधारणपणे नियमितपणे अदा केलेली आहेत.

viii) आमच्या मते कोणत्याही वित्तीय संस्था, बँका, शासन यांना देय किंवा कर्जरोखे धारक यांना देय अशा कोणत्याही रकमांची परतफेड करण्यात कंपनीने कसूर केली नाही.

ix) कंपनीने वर्षादरम्यान.प्रारंभिक सार्वजनिक प्रस्ताव किंवा पुढील सार्वजनिक प्रस्ताव (कर्ज साधनांसह) किंवा प्राधान्य वाटप किंवा शेअर्स किंवा परिवर्तनीय डिबेंचर (पूर्णपणे, अशंत: किंवा वैकल्पिकरित्या परिवर्तनीय) च्या खाजगी प्लेसमेंटद्वारे कोणतेही पैसे उभे केलेले नाहीत. त्यानुसार, आदेशाचे खंड (९) ३ लागू होत नाही.

x) आम्हाला दिलेल्या माहितीनुसार आणि स्पष्टीकरणानुसार आणि आम्ही तपासलेल्या नोंदीच्या आधारे, कंपनीने कोणतीही फसवणूक केलेली नाही आणि कंपनीची कोणतीही महत्वाची फसवूणक वर्षभरात लक्षात आली नाही किंवा नोंदवली गेली नाही.

xi) कंपनीने कोणतेही व्यवस्थापकीय वेतन प्रदान केले नाही त्यामुळे आदेशाचा परिच्छेद ३ (११) कंपनीला लागू नाही.

xii) आमच्या मते, कंपनी ही निधी कंपनी नाही त्यानुसार, आदेशाचे खंड (३)१२(लागू होत नाही

xiii) ही कंपनी पूर्णपणे शासनाच्या मालकीची आहे. त्यामुळे आमच्या मते संबंधित पक्षकारांबाबतच्या तरतुदी लागू नाहीत.

xiv) कंपनीने वर्षादरम्यान समभाग किंवा परिवर्तनीय कर्जरोखे (पूर्णपणे, अशंत: किंवा वैकल्पिकरित्या परिवर्तनीय) च्या प्राधान्य वाटप किंवा खाजगी प्लेसमेंटद्वारे कोणतेही पैसे उभे केलेले नाहीत.

xv) कंपनीने तिचे संचालक किंवा त्याच्याशी संबंधित व्यक्तींसोबत कोणतेही गैर-रोखीचे व्यवहार केलेले नाहीत.

xvi) कंपनीला भारतीय रिझर्व्ह बँक कायदा, १९३४ च्या ४५-IA अंतर्गत नोंदणीकृत असणे आवश्यक नाही.

एस बी एस के अँड असोसिएट्स
सनदी लेखापाल
संस्था नोंदणी क्रमांक: १११९५९W
सही/-
(सीए संजीव शेट्टी)
भागीदार
सदस्यत्व क्रमांक - ४५३१८

सहीचे ठिकाण - मुंबई
दिनांक - २४ मार्च, २०२१
युडीआयएन - २१०४५३१८AAAAEC९९८७

महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान महामंडळ मर्यादित यांच्या स्वतंत्र लेखापरीक्षकांच्या अहवालाचे "परिशिष्ट ब"

महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान महामंडळ मर्यादित यांच्या सदस्यांना आमच्या समदिनांकाच्या "इतर कायदेशीर आणि नियामक आवश्यकतांवरील अहवाल" अंतर्गत परिच्छेद २(फ) मध्ये संदर्भित आमचा अहवाल पहा)

कंपनी कायदा २०१३ च्या कलम १४३ च्या कलम ३ (i) नुसार वित्तीय अहवालावरील अंतर्गत वित्तीय नियंत्रण यावर अहवाल :

आम्ही महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान महामंडळ मर्यादितच्या दिनांक ३१ मार्च, २०१९ रोजी संपलेल्या वित्तीय वर्षाच्या वित्तीय विवरणाच्या लेखापरीक्षणाबरोबरच दिनांक ३१ मार्च, २०१९ रोजी संपलेल्या वित्तीय वर्षाच्या अहवालावरील अंतर्गत वित्तीय नियंत्रणाचेही लेखापरीक्षण केले आहे.

अंतर्गत वित्तीय नियंत्रणाकरिता व्यवस्थापनाचे दायित्व :

